

# "अहंल"

"श्री"


सौ. रमा (वसु) गोपाळ परांजपे
६६८ अ / ४ अ, मंगळवार पेठ
सातारा
मो. ९८५००७६९२८


राजन आज लवकर ऑफिसला आला होता. आल्याआल्याच त्याने कामात स्वतःला गुंतवून टाकले. थोड्यावेळाने त्याचे बॉस, "सारंग सरदेसाई" आले. त्यांनी आल्याआल्या लगेचच राजनला केबिनमध्ये बोलविले. राजन आणि सारंग सरदेसाई लहानपणा- पासून खास मित्र होते. दोघांचं एकमेकावर फार प्रेम होतं.

काय रे राजन, आज अगदी लवकर आला आहेत. काही विशेष.

हो, रोज विशेषच असतं, पण वेगवेगळं.

अरे, एवढा का बर रागावला आहेस. वहिनी काही बोलल्या का? नुसत बोलल्या नाहीत, अरे बाबा, काय नाही बोलल्या ते विचार मला ना या सर्वाचा आता फार त्रास होतो. समजावून, समजावून किती थकायचं. ही घरात कोणाशीच अजिबात पटवून घेत नाही. जिथं, तिथं हिचं शहाणपण. आमच्या घरातली सर्वजण तर तुला माहीतच आहेत. काहीही तक्रार न करता हिच्याशी नीटच वागतात तरी हिचं रोज काहीतरी वेगळंच असतं.

प्रत्येक बायकांचा मूड वेगळा असतो म्हणतात, पण त्यातून माझ्या बायकोचा मूड काहीतरी अजूनच वेगळा असतो. कधी ती फार चिडचिड करते, कधीतर तिला सगळ्याजगाचा राग येतो. जगात आपल्यावरच फार अत्याचार झालेत असे वाटते. कधी कधी खूप रोमॅंटिक मूडमध्ये असते. कधी आवरा, आवरीचा मूड असतो. पण पाच मिनिटात तो बदलतो, लगेच एक वाक्य येतं, पडू देत पसारा कोण बघतय एवढं. कधी शॉपिंगचा मूड, नको असलेल्या ढीगभर वस्तू घरात आणून टाकायच्या, आणि काही वेळा गरजेच्या वस्तू आणायलाही घराबाहेर जायचं नसतं. एके दिवशी ढीगभर नविन पदार्थ, काही वेळा ते संपत नाहीत, संपवावे लागतात. दुसरे दिवशी खावा शिळं, काही होत नाही. एखादा पदार्थ छान झाला, म्हणजे तिला आवडला तर आधी स्वतः पोटभर खाऊन घेते. बाकी कुणाला किती उरलाय हे बघतच नाही. कधी, कधी स्वतःच्या छान दिसण्यावर स्वतःच खूप खूष असते.

तासन्‌तास स्वतः स्वतःचाच राग,राग करते.

मला तर बाबा रोज उठल्यावर आधी,"हवामानाचा अंदाज" घ्यावा लागतो. घरचेतर तिला जाम घाबरूनच असतात. आम्ही दोघांनी मजेत रहावे ह्यासाठी ते सगळ सहन करतात. जरासुद्धा काहीही तक्रार करत नाहीत. मलाना ह्या सगळ्याचा खूप कंटाळा आला आहे. मुलांनाही आता कळायला लागलय. ती दोघही हिच्यावर खूप चिडतात.

अरे आजतर नविनच खूळ, दोन्ही मुलांना बाहेरचा क्लास लावायचा. आता घरात सबढ आई, बाबा, शिकविणारे असताना बाहेरच्या क्लासची काय गरज. बाहेरचे कितीतरी लोक आमच्या मुलांचा क्लास घ्या म्हणुन मागे लागतात. पण पूर्वी आई, बाबांनी खूप क्लासेस घेतलेत. मीच त्यांना आता विश्रांती घ्या असे म्हणतो. दोन्ही मुल आई,बाबांच सगळ ऐकतात. वर्गात पहिला नंबर काढतात. आणि काय पाहिजे. आज क्लास हा विषय घेवुन भरपूर भांडली. दोन्ही मुलांनी आम्ही बाहेर क्लासला जाणार नाही असं स्पष्ट सांगितलं. तिला कोणी विरोध केलेला चालत नाही. स्वतःच्या दोन्ही मुलांनीच विरोध केला. त्यामुळे नुसता,"तिळपापड झाला होता."

अरे राजन चिडू नकोस. माझी तर आई नेहमी म्हणते, "प्रत्येक बाईचा मुड वेगळाच असतो. पण बायका अशा आहेत म्हणुनतर रंग आहेत, रस, गंध निर्मिती आहे. जीवनाला स्वाद आहे, नाहीतर जीवन फक्त सुरी झाल असत. बेचव झाल असत, बायका आहेत, त्यांचा मुड आहे, म्हणुनच "लाईफ गुड आहे."

हो, त्यांना चांगली सुन मिळाली आहे ना? म्हणुन त्यांचं "लाईफ गुड" आहे. आमच्या घरच्यांचे कसे, किती हाल चालले आहेत, ते बघायला या घरी.

हो,हो, अरे किती त्रास करून घेशील. शांत रहा.

अरे, कसा शांत राहू. तुलातर सगळ माहीती आहे. किती कष्टाने माझ्या आई, बाबांनी मला शिकविले आहे. आता ह्या वयात त्यांना मी सुखात नको का ठेवायला? पण ही सगळ्यांना खूप त्रास देती. सतत घरच्यांशी फुरकून वागती

Sudharshan
PAGE : 3
DATE : / /20

त्यांची निंदा, नालस्ती करती.

हे बघ राजन, "आपण स्वतःची पाठ थोपटू शकत नाही. लाथही मारू शकत नाही. म्हणुनच माणसाच्या जीवनात हितचिंतकाची, व निंदकाची आवश्यकता असते." थोडे दिवसांनी अनुभवाने होईल शहाणी. तू काळजी करू नकोस.

सकाळी निवांत उठायच, तयार असलेला डबा घेउन ऑफिसला जायच, उशिरा घरी यायच, तोपर्यंत घरची सगळी काम झालेली असतात. स्वतःचा पगार फक्त स्वतःवर म्हणजे स्वतःवरच खर्च करायचा, त्या पैशातून मुलांनाही काहिही आणायचे नाही, मग बाकीच्याचा कहि प्रश्न नाहीच. हे तिच असं सगळं वागणं घरचे सहन करतात. काहिही तक्रार करत नाहीत. तरी हिचाच "टेंभा".

असु देत. आपण त्यातून काहीतरी मार्ग काढू. तू काळजी करू नकोस शांत रहा.

दुसरे दिवशी सारंगला एक मस्तपैकी युक्ती सुचली. त्याने ती युक्ती राजनला समजावून सांगितली.

छे, रे **सारंग**, हे कसे शक्य आहे. मी आई, बाबांना सोडून इतक्या लांब कसा राहू. नाही हे मला शक्य नाही.

अरे, कायम कुठे जायच आहे. थोडे दिवसांचातर प्रश्न आहे. तुला भरपूर पैसा मिळेल आणि शांततापण. तुला वहिनींना चांगली "अद्दल" घडवायची आहे ना? मग तुला हे थोडे दिसव सगळ सहन करावच लागेल. बघ, विचार कर. उद्या काय ते नक्की सांग. सारंग राजना म्हणाला.

राजन रात्रभर जागाच होता. त्यानं खुप विचार केला त्याला सारंगच बोलणं पटलं. राजनने सारंगची ऑफर स्विकारली आणि तसे सारंगला सांगितलेही.

ही अतिशय आनंदाची बातमी त्याने पहिलेंदा बायकोला म्हणजे सुपर्णाला सांगितली. ती तर इतकी खुष झाली की तिला काय करू, काय नको असे झाले. आता आपला "राजाराणीचां संसार" ह्या आनंदाती रममाण झाली. आई, बाबा, धाकटी बहिण, भाऊ थोडे नाराज झाले. कारण राजनवर त्यांच खुप प्रेम होत, आणि आजपर्यंत त्याला सोडून लांब असे कधी राहिलेच नव्हते. पण राजनला चांगला

PAGE: 4
DATE: / /20

मिळतोय. त्याची प्रगति होते. त्याचाहि त्यांना खूप आनंद झाला होता. त्यामुळे त्यांनी सर्वांनी आनंदाने राजनला जाण्याची परवानगी दिली.

परदेशी जायच याचा मुलांना खूप आनंद झाला होता. पण आजी, आजोबा, काका, आत्या सर्वांना सोडून जायच त्यांना वाईट वाटत होत. आजीने समजूत घातली, अरे थोडेच दिवसांचा प्रश्न आहे. जा आता मस्त मजा करून या. मग मुलांना जरा ते पटल.

सुपर्णालाहि ऑफिसने तिकडे जाण्याची परवानगी दिली. त्यामुळ ती खूप खुषित होती. म्हणता, म्हणता जाण्याचा दिवस उजाडला. ठरल्याप्रमाणे सर्व लवाजमा घेउन राजन अमेरिकेला रवाना झाला. ऑफिसने रहायची सोय केली होती सुपर्णाचेही ऑफिस जवळच होत.

सुपर्णाला कामाची अजिबातच सवय नव्हती. इथं तर सगळच करायला लागत होत. त्यामुळ तिची खूप धांदल उडत होती. तिची धांदल बघुन राजनच्या मनात "आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

राजन न चुकता रोज आई, बाबांना फोन करत होता. पैसेही पाठवत होता. सारंगही रोज चौकशी करत होता. त्यामुळे राजन निरधास्त होता. सुपर्णाचे काम, ऑफिसमुळे गडबड व्हायची. तिला फोन करायला वेळच मिळत नव्हता. आईबाबा मात्र तिची न चुकता चौकशी करायचे. तिची काळजी घे, तिला कामात मदत कर[illegible] असे सांगायचे.

तिची काळजी घ्यायला ती समर्थ आहे. माझी तिला अजिबात गरज नाही. मी असे बाबांना सांगितले.

हे ऐकून बाबा ओरडले, राजन असे बोलायचे नाहि, वागायचेहि नाहीच. अरे, "पाहता क्षणी एखादि व्यक्ति आवडणे हे "आकर्षण" असतं, परत, परत पहावस वाटणं हा "मोह" असतो. त्या व्यक्तिच्या जवळून जाणे ही "ओढ" असते. त्या व्यक्तिला जवळून जाणनं हा "अनुभव" असतो. आणि त्या व्यक्तिला तिच्या गुणदोषासकट स्विकारण हेच खर प्रेम असत. नात्यांची सुंदरता एकमेकांच्या चुका स्विकारण्यात आहे. कारण एकही दोष नसलेला माणसांचा शोध घेत बसलात

तर मुकाटे रहाल.

दोन महिन्यांनी मला ऑफिसने कामानिमित्त भारतात परत बोलविले. महिनाभर रहावे लागणार होते. मी खूप आनंदात होतो. सुपर्णा असून स्वेतच होती. अधुन, मधुन दोन महिने अमेरिका, महिनाभर भारत असे माझे चालले होते. मला घरच्यांचा व्यवस्थित सहवास लाभत होता. बरेच कार्यक्रम मी ॲटेंड करत होतो. कार्यक्रमांचा आनंद घेत होतो. पगारही चांगला मिळत होता. त्यामुळे घरच्यांचे सर्व लाड पूरवत होतो. सुपर्णाला मात्र रजेमुळे सख्ख्या भावाच्याही लग्नाला यायला मिळाले नाही. मध्यंतरी तिच्या आईची तब्येत खूप बिघडली होती. पण तिला येता आले नाही.

दोन्ही मुलं तिकडे रमत नव्हती. त्यांना तिकडची हवा सुट होत नव्हती. सारखी आजारी पडू लागली. त्यामुळे ती दोघंही भारतात परत आली. आजी-आजोबांची सवय असल्यामुळे इकडे ती खूप आनंदात होती. सुपर्णाची मात्र खूप पंचायत झाली होती. मुलांशिवाय करमत नव्हते. बराचवेळा मुकाट रहाव लागत होत. कंटाळा आला होता. कंपनीने पाच वर्षाचा बॉंड लिहून घेतला होता. त्यामुळे तिकडे रहाण्याशिवाय गत्यंतर नव्हत.

आपोआपच स्वभावात थोडा, थोडा बदल होत होता. ते राजनला जाणवत होत. माणसांची किंमत आता कळू लागली होती. भारतात यायची सर्वांना भेटायची ओढ लागली होती. पण करणार काय नाईलाज होता. म्हणतात ना [illegible] नेहमी होत ते चांगल्यासाठीच--

ह्या सर्वात राजन खूप आनंदात होता. सारंगच्या आयडियामुळे सुपर्णाला चांगलीच "अद्दल" घडली होती. म्हणता, म्हणता, पाच वर्ष संपली.

पाच वर्षाची "काळ्या पाण्याची" शिक्षा भोगुन सुपर्णाचा मायदेशी परतण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला होता. स्वभावातल्या थोड्याफार बदलामुळे राजनची काळजी कमी झाली होती. तो ही सुपर्णाची आतुरतेने वाट पहात होता. आनंदात होता. ह्याच सार श्रेय सारंगला आणि [illegible] - - - -

सारंगनाच.....
असा आयडियल मित्र सर्वांना मिळो.

